# जिल्हा निवड समिती सोलापूर

## जिल्हा परिषद सोलापूर

## निविदा सुचना 2019-2020

**जा.क्र.जिपसो/साप्रवि-१/कार्या-३ अ/२०००/१९ सोलापूर दि. ३१/१२/२०१९**

जिल्हा परिषद, सोलापूर अंतर्गत अनुसूचित जमाती साठी राखीव असलेली गट - क गट - ड संवर्गातील रिक्त पदाच्या भरती प्रक्रियेसाठी खाली नमुद केले नुसार ऑनलाईन आज्ञावली (सॉफ्टवेअर ) वापरून सर्व समावेशक संगणकीय कामकाज करावयाचे असल्याने स्थानिक बाजारपेठेतुन मोहोरबंद लिफामध्ये दरपत्रक मागविणेत येत आहे. तेव्हा इच्छुक पुरवठाधारकांनी दर व इतर सर्व समावेक्षक कर सेवा कर/वस्तु व सेवा शुल्क कर यांचा तपशीलवार उल्लेख करावा.

| कामाचा तपशिल | शेरा |
|---|---|
| १) ऑफलाईन अर्जाचे बिनचुक नोंदणीसाठी पदनिहाय पात्रता व निकष मॅपिंग करुन सरल पध्दतीने ऑफलाईन अर्ज प्रणाली डिझाईन करणे.<br>२) त्यानुसार पात्र उमेदवारांचे अर्ज तपासणे व त्यावर प्रक्रिया करून संवर्गनिहाय व प्रवर्गनिहाय समांतर आरक्षणानुसार याद्या संवर्गनिहाय लेखी परिक्षेच्या दिनांकापुर्वी तीन दिवस अगोदर तयार करणे.<br>३) उत्तरपत्रिका विहित नमुन्यामध्ये ओएमआर शिटवर कार्बन प्रतिसह छपाई करून देणे.<br>४) **संवर्गनिहाय लेखी परिक्षा झालेनंतर लगेचच त्याच दिवशी उत्तरपत्रिकांचे (ओएमआर शिट) स्कॅनिंग करून देणे, व जिल्हा निवड समितीच्या मान्यतेने तात्पुरती उत्तरतालिका संकेतस्थळावर प्रसिध्द करुन विहित कालावधीत हरकती मागणी करणे.**<br>५) प्राप्त हरकतींचे एकत्रिकरण करुन जि.प.चे संबधित विभाग प्रमुखांकडे सुपुर्द करणे.<br>६) जि.प.चे संबधित विभाग प्रमुखांकडुन अंतीम उत्तरतालिका प्राप्त करुन ती संकेतस्थळावर प्रसिध्द करणे.<br>७) जिल्हा निवड समिती ठरवेल त्या-त्या दिवशी संवर्गनिहाय उमेदवारांचे आसन क्रमांक निहाय लेखी परिक्षेतील गुणदान यादी प्रसिध्द करणे.<br>८) प्रवर्गनिहाय व समांतर आरक्षणानुसार तात्पुरती निवड यादी व तात्पुरती प्रतिक्षा यादी विहित नमुन्यात तयार करुन देणे.<br>**वरीलप्रमाणे तसेच अनुषंगिक भरती प्रक्रियेशी संबधित कामे मुदतीमध्ये करणे.** | निविदा दर प्रति उमेदवार सर्व करासह नमुद करावा. |

**माहिती व अटी :-**

१) वरील कामांची निविदा ही जि.प सांकेतिक स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच याबाबत अधिकमाहितीसाठी सामान्य प्रशासन विभाग क्रं.१ , जिल्हा परिषद, सोलापूर येथे ०२१७-२७२७०३५ या क्रमांकावर संपर्क साधावा. या निविदे संबधित यापुढील सुचना/ शुध्दीपत्रके ही जि.प संकेतस्थळावर ऑनलाईन प्रसिध्द करण्यात येतील.

२) प्राप्त झालेली दरपत्रके ही दिनांक ०८/०१/२०२० रोजी दुपारी ३.०० ते ४.०० च्या सुमारास उघडण्यात येतील.

**निविदाबाबत आवश्यक सुचना :-**

१) सदर कामासाठीच्या अटी व शर्ती तसेच निविदा दाखल करण्याचे वेळापत्रक इ. माहिती उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.
२) निविदेतील अटी व शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रे दरपत्रकामध्ये समावेश करणे आवश्यक राहिल.
३) वरील अ.क्र.२ मध्ये नमुद कागदपत्रांची निविदेसोबत पुर्तता न झाल्यास प्राप्त दरपत्रक हे अवैध ठरविले जाईल.
४) प्राप्त झालेली दरपत्रके ही उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र.), जिल्हा परिषद, सोलापूर येथे उघडले जातील.
५) कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा त्यातील कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.
६) **घोषणापत्राचा नमुना:-**

| **घोषणापत्र** | | |
|---|---|---|
| १ | निविदेकाराचे संपर्ण नांव आणि संपुर्ण पत्ता (मराठी व इंग्रजीमध्ये ) | |
| २. | संस्था असल्यास प्राधिकृत इसमाचे नाव व पत्ता आणि संपर्क दूरध्वनी/ भ्रमध्वनी क्रमांक | |
| ३ | संस्थेचा संपर्क दूरध्वनी/ भ्रमध्वनी क्रमांक | |
| ४. | संस्था रजिस्ट्रेशन क्रमांक आणि वैद्य कालावधी | |
| ५. | ऑनलाईन भरती प्रक्रियेचे आज्ञावील (सॉफ्टवेअर) तयार करून प्रक्रिया पुर्ण केले कामांचा अनुभव आहे काय ? | |
| | ५ (अ) असल्यास त्याबाबतचा संपुर्ण तपशिल द्यावा आणि कामे समाधानकारक पुर्ण केल्याबाबतची संबधिताकडील प्रमाणपत्रे जोडावीत. | |
| ६. | ओ.एम.आर. मशीन स्वतःचे आहे अगर भाडयाने घेणार आहे काय? | |
| | ६ (अ) भाडयाने घेणार आहे त्याचा तपशिल दयावा व त्याचे रूपये १००/- च्या बॉडपेपरवरील संमतीपत्र दरपत्रकासोबत जोडावे. | |
| ७. | कामासाठी वापरण्यांत येणाऱ्या ओ.एम.आर. मशिनचे स्पेशिफिकेशन नमुद करावे. | |
| ८ | पॅन क्रमांक | |
| ९. | स्कॅनर मशिनचा वेग प्रति मिनिट किती आहे? | |
| १० | निविदा धारकाचे संगणक संच व प्रिंटर्स किती आहेत? व सदर कामाची माहिती असणारे संगणक ऑपरेटर्स किती आहेत? | |
| ११. | निविदेतील सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असून त्या मला विनाअट मान्य आहेत. | |

**स्थळ :-**
**दिनांक :-** **निविदाकाराचे संपुर्ण नांव व सही**
**(रबरी स्टॅपसह)**

**दरपत्रके मागणी बाबत अटी व शर्ती**

१. निविदा दर सर्व करासह नमुद करणे आवश्यक आहे.

२. ठेकेदारास आपल्या वतीने सदरचे काम दुसऱ्या व्यक्तीस/ संस्थेस देता येणार नाही. वा एजंट नेमता येणार नाही.

३. काम करताना झालेल्या नुकसानीस संबधित ठेकेदार जबाबदार राहील. याबाबत कोणतीही नुकसान भरपाई देय राहणार नाही.

४. या कामाबाबत अध्यक्ष, जिल्हा निवड समिती सोलापूर तथा जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन करणे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

५. कामाचा ठेका मंजूर झाल्यानंतर व कार्यारंभ आदेश काढल्यानंतर निविदाकाराने काम नाकारल्यास अथवा गोपनीयताचा भंग केल्यास अथवा काम अर्धवट अवस्थेमध्ये सोडून दिल्यास, काही गैरप्रकार किंवा अनियमितता झाल्यास ठेकेदाराविरुध्द भा.दं.वि.संहितेनुसार कारवाई करण्यात येईल. तसेच झालेला खर्च सव्याज वसुल करण्यात येईल.

६. प्रणाली सहजगत्या समजणारी अथवा वापर करणेस सोपी असलेली (युजर फ्रेंडली) हवी तसेच प्रणालीवर प्राप्त अर्जाची माहिती पदानुसार आवश्यक पात्रता व निकष मॅपिंग केलेले असावे म्हणजे अपात्र उमेदवार परिक्षेस बसु शकत नाही अथवा अपात्र उमेदवाराचे कोणतेही नाव पात्र उमेदवारामध्ये/प्रवेश पत्रामध्ये समाविष्ट होणार नाही याची दक्षता घ्यावी.

७. निविदेतील कामे अध्यक्ष्, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी सोलापूर यांनी नेमुन दिलेल्या ठिकाणी करावयाची आहेत. गोपनीयतेच्या दृष्टिकोनातून या कामासाठी ठेकदाराकडून नियुक्त करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्याची नावे व त्यांचे संपुर्ण पत्ते आगाऊ देणे बंधनकारक राहील. अथवा मक्तेदारांनी दरपत्रकासोबत सादर करणे आवश्यक राहील.

८. तांत्रिक दोषांमुळे अन्य कोणत्याही कारणांमुळे काम बिनचुक व समाधानकारक न झाल्यास त्यांची संपुर्ण जबाबदारी ठेकेदारावर राहील.

९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर तथा सदस्य निवड समिती, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी काम समाधानकारक असल्याचा दाखला दिल्यानंतर ठेकेदारास देयकाची रक्कम अदा केली जाईल.

१०. निविदाकार व त्यांचे कर्मचारी कोणत्याही राजकीय पक्षांशी संबधित असता कामा नये.

११. ठेकेदारास कोणत्याही प्रकारचे ॲग्रीम (ॲडव्हान्स) दिले जाणार नाही.

१२. कामाकरिता वापरण्यात येणारे ओ.एम.आर. स्कॅनिंग मशिन आणि कागद हे A-४/ Legal या साईज मधील ९० GSM प्रकारातील उत्तम दर्जाचे व मान्यताप्राप्त कंपनीचे असणे आवश्यक आहे.

१३. नेमून दिलेले काम मुदतीत पुर्ण करणे बंधनकारक राहील. अन्यथा निविदाधारकांच्या देय रक्कमेतून ५०% रक्कम वजा करण्यांत येईल.

१४. दरपत्रके सादर करणेचा कालावधी दि.०७/०१/२०२० पर्यंत वैध राहील.

१५. स्कॅनर मशिनचा उत्तरपत्रिका स्कॅन करण्याचा वेग किमान प्रति मिनिट २० इतका असणे आवश्यक आहे.

१६. उत्तरपत्रिका स्कॅनिंग करिता वापरणेत येणारे स्कॅनर व संगणक उत्तम दर्जाचे आणि आधुनिक तंत्रज्ञान असणे आवश्यक आहे.

१७. निविदाधारकाने उमेदवारांचे संख्येनुसार आवश्यक तेवढे संगणक संच व प्रिंटर्स सदर कामाची माहिती असणाऱ्या या संगणक ऑपरेटसह उपलब्ध करणे आवश्यक आहे. तसेच सदर ऑनलाईनचे कामासाठी इंटरनेटची सुविधा असणेही आवश्यक आहे.

१८. उमेदवारांची प्रणालीवर माहिती करप्ट न होणे Data security आणि Data safety याबाबत निविदाधारकाने आपले स्तरावर उपाय योजना करणे आवश्यक आहे. तांत्रिक सदोषामुळे माहिती नष्ट झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकावर राहील. ऑफलाईन पध्दतीने भरती प्रक्रिया राबवत असताना Cyber security, Copyright, TRIPS, Patent, Software, License बाबतची जबाबदारी निविदाधारकांची राहील. सदर बाबतीत कोणताही प्रश्न उद्भवल्यास

निविदाधारक हे स्वतः जबाबदार राहतील. याबाबतीत जिल्हा निवड समिती कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही.

१९. निविदा मंजुर झालेल्या ठेकेदाराने अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी सोलापूर यांनी ठरवून दिलेल्या विहित नमुन्यात रूपये १००/- (रूपये शंभर मात्र ) इतक्या रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा लिहून देणे बंधनकारक राहील.

२०. वरील कोणत्याही अटीचा भंग झाल्यास अथवा विहित मुदतीत काम समाधानकारक व बिनचुक न झाल्यास संबधित ठेकेदारवर फौजदारी कारवाई करण्यांत यईल. अशा परिस्थितीत कामाचे गांभीर्य ओळखून अन्य व्यक्ती/ संस्थेकडून काम पुर्ण केले जाईल व त्याबाबत देयकाची संपुर्ण रक्कम संबधित ठेकेदाराकडून वसूल केली जाईल

२१. निविदा दाखल केलेल्या कंत्राटदारास निविदेसंदर्भात न्यायालयीन दावा दाखल करावयाचा झाल्यास सदर दाव्याचे कार्यक्षेत्र सोलापूर हे राहील. कोणत्याही अटीच्या अर्थाबद्दल किंवा इतर कोणत्याही विवाद उद्भवल्यास, करार नामंजुर करणे, आवश्यक वाटल्यास काम विभागून देणे अथवा उपरोक्त अटी व शर्ती बदलण्याचा अथवा रद्द करण्याचा तसेच निविदेचा वैद्य कालावधी वाढविण्याचा अगर कमी करण्याचा अधिकार अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी सोलापूर यांनी राखून ठेवलेला आहे.

२२. निविदा करार करणेपुर्वी ऑफलाईन आज्ञावली (सॉफ्टवेअर) बाबत ऑफलाईन चाचणी / प्रात्यक्षिके प्राथमिक टप्प्यापासून अंतिम टप्प्यापर्यंत यशस्वीरित्या पुर्ण करून दाखविणे बंधनकारक राहिल. तसेच प्रणालीमध्ये कार्यालयाचे सूचने प्रमाणे आवश्यक ते बदल करणे बंधनकारक राहिल.

२३. दरपत्रकामध्ये खालील बाबीचा समावेश असलाच पाहिजे.

a) निविदा अटी व शर्ती विनाअट मान्य असलेबाबतचे अधिकृत घोषणापत्र (विहित नमुन्यात)
b) संस्था नोंदणीकृत असलेचे प्रमाणपत्र.
c) पॅन/GST कार्डची साक्षांकित छायाकिंत प्रत.
d) यापुर्वी संस्थेने ऑफलाईन भरती प्रक्रिया यशस्वीरित्या पुर्ण केले बाबतचे प्रमाणपत्र.
e) ओ.एम.आर. स्कॅनिंग मशिन स्पेशिफीकेशन प्रमाणपत्र.
f) संगणक, प्रिंटर व ऑपरेटर यांची माहिती (उदा. संगणक, प्रिंटर, स्कॅनर संख्या, मॉडेल वर्ष, ऑपरेटर संख्या इ.) वरील अ.क्र.(अ) ते (फ) ही कागदपत्रे लखोटा क्र.१ मध्ये (PDF फॉर्ममध्ये समाविष्ठ करणेत यावीत.)
g) मागील वर्षीचे GST भरणा केलेचे प्रमाणपत्र
h) मागील तीन वर्षाचे आयकर विवरणपत्र.

सदर दरपत्रके हे दि.०७/०१/२०२० रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत पोहोचतील अशा बेताने बंद लिफाफ्यातुन उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) यांचे नावे पाठवावे व लिफाफ्यावर **ओ.एम.आर भरती प्रक्रिया कामकाज दरपत्रक** असा स्पष्ट अक्षरात उल्लेख करावा.

**(परमेश्वर राऊत)**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशा.)**
**जिल्हा परिषद, सोलापूर**

प्रत - १) कार्यालयीन नोटीस बोर्डावर.
२) ई-मेल आय.टी सेल -जिल्हा परिषद सोलापूर या सांकेतिक स्थळावर प्रसिध्दीसाठी